ICICI Home Finance

FAAA/Stable by CRISIL
Highest Degree of Safety

MAAA/Stable by ICRA
Highest Degree of Safety

AAA/Stable by CARE
Highest Degree of Safety

आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई – 400 051.
कॉर्पोरेट कार्यालय : आयसीआयसीआय ऐचएफसी टॉवर, अंधेरी कुर्ला रोड, जेबी नगर, अंधेरी पूर्व, मुंबई – 400 059.
CIN : U65922MH1999PLC120106, Website: www.icicihfc.com, E-mail: investor.relations@icicihfc.com

< ₹ 2 करोड रकमेच्या (सार्वजनिक ठेवी) फिक्स्ड डिपॉझिट्ससाठी बेस दर (% प्रति वर्ष)

03 जानेवारी 2023 पासून प्रभावी					
कालावधी (महिन्यांमध्ये)	संचयी		असंचयी		
	संचयी प्लॅन	निदर्शक उत्पन्न (संचयी पर्याय)	मासिक उत्पन्न योजना	त्रैमासिक उत्पन्न योजना	वार्षिक उत्पन्न योजना
>=12 to <24	7.00%	7.00%	6.80%	6.85%	7.00%
>=24 to <36	7.30%	7.57%	7.05%	7.10%	7.30%
>=36 to <48	7.40%	7.96%	7.15%	7.20%	7.40%
>=48 to <=120	7.50%	8.39%	7.25%	7.30%	7.50%
किमान ठेव	10,000/-		40,000/-	20,000/-	10,000/-
ज्येष्ठ नागरिक व आयसीआयसीआय समूह कर्मचाऱ्यांसाठी 0.25% अतिरिक्त दर					

< ₹ 2 करोड रकमेच्या (सार्वजनिक ठेवी) फिक्स्ड डिपॉझिट्ससाठी विशेष योजनेचे दर (% प्रति वर्ष)

03 जानेवारी 2023 पासून प्रभावी					
कालावधी (महिन्यांमध्ये)	संचयी		असंचयी		
	संचयी प्लॅन	निदर्शक उत्पन्न (संचयी पर्याय)	मासिक उत्पन्न योजना	त्रैमासिक उत्पन्न योजना	वार्षिक उत्पन्न योजना
39	7.40%	8.05%	7.15%	7.20%	7.40%
45	7.60%	8.45%	7.35%	7.40%	7.60%
65	7.70%	9.15%	7.45%	7.50%	7.70%
किमान ठेव	10,000/-		40,000/-	20,000/-	10,000/-
ज्येष्ठ नागरिक व आयसीआयसीआय समूह कर्मचाऱ्यांसाठी 0.25% अतिरिक्त दर					

< ₹ 2 करोड रकमेच्या (सार्वजनिक ठेवींच्या व्यतिरिक्त) फिक्स्ड डिपॉझिट्ससाठी बेस दर (% प्रति वर्ष)

03 जानेवारी 2023 पासून प्रभावी					
कालावधी (महिन्यांमध्ये)	संचयी		असंचयी		
	संचयी प्लॅन	निदर्शक उत्पन्न (संचयी पर्याय)	मासिक उत्पन्न योजना	त्रैमासिक उत्पन्न योजना	वार्षिक उत्पन्न योजना
>=12 to <24	7.00%	7.00%	6.80%	6.85%	7.00%
>=24 to <36	7.30%	7.57%	7.05%	7.10%	7.30%
>=36 to <48	7.40%	7.96%	7.15%	7.20%	7.40%
>=48 to <=120	7.50%	8.39%	7.25%	7.30%	7.50%
किमान ठेव	10,000/-		40,000/-	20,000/-	10,000/-

1. उल्लेख करण्यात आलेले उत्पन्न (यील्ड) ही प्रत्येक कालावधीच्या ग्रिडच्या पहिल्या महिन्याचा वापर करून परिगणित करण्यात येते आणि संचयी ठेवींच्या बाबतीत, व्याजाची चक्रवाढ कर वजावटीपूर्वी करण्यात येते.
2. यील्ड टू मॅच्युरिटी ही केवळ संचयी ठेवींच्या बाबतीत लागू आहे.
3. ठेवी या 12 ते 120 महिन्यांमध्ये कितीही महिन्यांसाठी ठेवता येऊ शकतात.

< ₹ 2 करोड रकमेच्या (सार्वजनिक ठेवींच्या व्यतिरिक्त) फिक्स्ड डिपॉझिट्ससाठी विशेष योजनेचे दर (% प्रति वर्ष)

03 जानेवारी 2023 पासून प्रभावी					
कालावधी (महिन्यांमध्ये)	संचयी		असंचयी		
	संचयी प्लॅन	निदर्शक उत्पन्न (संचयी पर्याय)	मासिक उत्पन्न योजना	त्रैमासिक उत्पन्न योजना	वार्षिक उत्पन्न योजना
39	7.40%	8.05%	7.15%	7.20%	7.40%
45	7.60%	8.45%	7.35%	7.40%	7.60%
65	7.70%	9.15%	7.45%	7.50%	7.70%
किमान ठेव	10,000/-		40,000/-	20,000/-	10,000/-

1. संचयी ठेवींच्या बाबतीत, व्याजाची चक्रवाढ कर वजावटीपूर्वी करण्यात येते.
2. यील्ड टू मॅच्युरिटी ही केवळ संचयी ठेवींच्या बाबतीत लागू आहे.

टीप:
- व्याजाची चक्रवाढ वार्षिक स्वरुपात करण्यात येते.
- >= ₹20.0 दशलक्ष असण्याच्या बाबतीत, केस टू केस आधारावर दर देऊ करण्यात येईल.
- व्याज दर हे कंपनीच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार आणि कायद्याअंतर्गत विहित करण्यात आल्याप्रमाणे बदलाच्या अधीन आहेत आणि लागू दर हा ठेवीच्या तारखेला प्रचलित असणारा दर असेल.
- कंपनी ही आरबीआयने विहित केल्याप्रमाणे प्रतिवर्ष 12 टक्के व्याज दरापेक्षा अधिकने सार्वजनिक ठेवी आमंत्रित करणार नाही किंवा स्वीकारणार नाही किंवा नूतनीकरण करणार नाही.

क्रेडिट रेटिंग: (पत मानांकन): आयसीआयसीआय होम फायनान्स फिक्स्ड डिपॉझिटला क्रिसिल, आयसीआरए व केअर यांद्वारे 'एएए/स्थिर' असे सर्वोच्च पत मानांकन देण्यात आलेले आहे.

महत्त्वपूर्ण अटी व शर्ती

कंपनी ही, तिच्या स्वेच्छानिर्णयानुसार, निम्नलिखित अटी व शर्ती यांच्या सापेक्ष आयसीआयसीआय होम फायनान्स फिक्स्ड डिपॉझिट स्कीमच्या ('स्कीम') अंतर्गत फिक्स्ड डिपॉझिट्स स्वीकारेल. कंपनीद्वारे अभियाचना करण्यात आलेल्या या ठेवी विमाबद्ध नाहीत.

1) स्वीकृतीचा प्रकार

ए. आरटीजीएस/एनईएफटी/एफटी:

तपशील	कोणत्याही बँकेकडून वित्तप्रेषण
लाभार्थ्याचे नाव	आयसीआयसीआय होम फायनान्स कं.लि.– एफडी संकलन रक्कम
खाते क्र.	000405070754
आयएफएससी	ICIC0000004
बँक व शाखा	आयसीआयसीआय बँक, नरिमन पॉइंट

प्रभावी ठेव तारीख: कंपनीच्या खात्यामध्ये धनादेश/डीडी वटवण्याची/ रक्कम जमा होण्याची तारीख

बी. धनादेश/डिमांड ड्राफ्ट (डीडी): धनादेश/डीडी हा "ICICI Home Fin -FD /c" यांच्या नावे काढायचा आहे आणि 'Account Payee only' असे नमूद करायचे आहे. अर्जदाराचे ('अर्जदार') नाव धनादेशाच्या/डीडीच्या मागच्या बाजूला लिहिण्यात यायला हवे. प्रत्येक आवेदनासह एकल व स्वतंत्र धनादेश/डीडी सोबत असायला हवा.

सी. पेमेन्ट गेटवे: आमच्या वेबसाइटद्वारे (www.icicihfc.com) ऑनलाइन फिक्स्ड डिपॉझिटसाठी आवेदन करण्याच्या बाबतीत, पेमेन्ट हे नेट बँकिंगद्वारे करणे आवश्यक आहे. सदरसाठीचा पेमेन्ट गेटवे वेबसाइटवर उपलब्ध आहे.

डी. पर्यायाने, पेमेन्ट हे (i) एनईएफटी/आरटीजीएस/निधी हस्तांतरण, (ii) डेबिट कार्ड, (iii) युनिफाइड पेमेन्ट इंटरफेस (भिम–यूपीआय), (iv) युनिफाइड पेमेन्ट्स इंटरफेस क्विक रिस्पॉन्स कोड (यूपीआय क्यूआर कोड) (भिम–यूपीआय क्यूआर कोड) यांच्याद्वारे करण्यात येऊ शकते.

2) आवेदन फॉर्म्स सादर करणे: यथोचितरीत्या भरलेला फिक्स्ड डिपॉझिटचा आवेदन फॉर्म, केवायसी फॉर्म, कंपनीच्या पॉलिसीप्रमाणे आवश्यक दस्तऐवज व धनादेश/डीडी, जर असल्यास, हे कंपनीच्या स्थानिक/नजीकच्या शाखेमध्ये/कॉर्पोरेट कार्यालयामध्ये सुपुर्द करणे गरजेचे आहे.

3) व्याजाचा भरणा: कंपनीच्या खात्यामध्ये धनादेश/डीडी वटण्याच्या/रक्कम जमा होण्याच्या सापेक्ष, व्याज हे ठेवीच्या प्रभावी तारखेपासून ठेवीवर प्रदेय असेल. मासिक उत्पन्न योजना, त्रैमासिक उत्पन्न योजना व वार्षिक उत्पन्न योजना यांच्या अंतर्गत ठेवण्यात आलेल्या ठेवींवरील व्याज हे खाली देण्यात आल्याप्रमाणे नियत तारखेला प्रदान करण्यात येईल:

स्कीम	व्याज भरणा दिनांक
मासिक उत्पन्न योजना (एमआयपी)	दर महिन्याचा शेवटचा दिवस
नॉन–कम्युलेटिव्ह (बिगर–संचयी)– त्रैमासिक पर्याय	30 जून, 30 सप्टेंबर, 31 डिसेंबर आणि 31 मार्च
वार्षिक उत्पन्न योजना	मार्च 31

संचयी उत्पन्न योजनेच्या अंतर्गत, दर वर्षाला व्याजाची चक्रवाढ करण्यात येईल आणि जेथे लागू असेल तेथे, कर वजा झाल्यानंतर दर वर्षी 31 मार्च रोजी ते उपार्जित होईल. जमा झालेले व्याज हे परिपक्वता रकमेवर प्रदान करण्यात येईल आणि ते चक्रवाढीच्या आधारावर वर्षागणिक परिगणित करण्यात आलेल्या एकूण परिपक्वता रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

कृपया याची नोंद घ्या की आंशिक कालावधीसाठीची सर्व पेमेन्ट्स हे यथाप्रमाण आधारावर करण्यात येतील. प्रमाण व्याज भरणा तारखेआधीच्या 20 दिवसांच्या कालावधीमध्ये ठेव ठेवण्यात आलेली असल्यास, आंशिक कालावधीसाठीचे व्याज हे पुढील प्रमाण व्याज भरणा तारखेला प्रदान करण्यात येईल.

अर्जदार/ठेवीदार यांना मुख्यत्वे व्याजाचा भरणा हा जेथे ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस सुविधा उपलब्ध आहे, तेथे ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस याद्वारे करण्यात येईल. जेथे ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस सुविधा उपलब्ध नाही, तेथे पेमेन्ट्स हे धनादेशाच्या/डीडीच्या/कंपनीला योग्य वाटेल त्या इतर कोणत्याही प्रकाराच्या स्वरुपामध्ये करण्यात येईल आणि "A/c Payee only' असा उल्लेख करून एकमेव/प्रथम अर्जदार/ठेवीदार यांच्या नावे असेल. प्रथम /एकमेव धारकाचे आयसीआयसीआय बँक लिमिटेडमध्ये खाते असल्यास, थेट क्रेडिटचा पर्याय वापरण्यात येऊ शकतो.

पहिला अर्जदार/ठेवीदार हा अल्पवयीन असण्याच्या बाबतीत, सर्व पेमेन्ट्स हे नैसर्गिक/कायदेशीर पालकासह (गार्डियनसह) अल्पवयीन व्यक्तीच्या नावे असतील. अशा सर्व बाबतीत जेथे व्याज हे एकमेव धारक/प्रथम अर्जदार/ठेवीदार यांच्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीला प्रदान करायचा असल्यास (आवेदन फॉर्मवरील संयुक्त ठेवी व उत्तराधिकार यांसाठी लागू अटी व शर्ती यांचा संदर्भ घ्या), एकमेव धारक/प्रथम अर्जदार/ठेवीदार यांच्या नावे असणारे सर्व उत्तर–दिनांकीत असे वटवणी न झालेले व्याज इन्स्ट्रुमेन्ट (इन्स्ट्रुमेन्ट्स), जर असल्यास, हे कंपनीकडे स्वाधीन करावे लागतील.

4) ठेवीचे नूतनीकरण/परतफेड:

ए. ठेवीच्या नूतनीकरणासाठी किंवा परतफेडीसाठी, डिस्चार्ज केलेली ठेव पावती ही आयसीआयसीआय होम फायनान्स कं. लि. यांच्याकडे स्वाधीन करणे आवश्यक आहे. नूतनीकरणाच्या बाबतीत, जुन्या ठेवीच्या परिपक्वता तारखेला लागू असल्याप्रमाणे योजनेच्या सदर अटी व शर्तींनुसार परिपक्वतेला ठेवीचे नूतनीकरण करण्यात येऊ शकते.

बी. आवेदनाच्या वेळी या संबंधात स्पष्ट संमती देऊन एकतर मुद्दल रकमेचे स्वयंचलित नूतनीकरण करता येऊ शकते/मुद्दल व व्याज यांचे नूतनीकरण करता येऊ शकते.

सी. ठेवीदार हा त्याच्या/तिच्या निर्देशित बँक खात्यामध्ये, संपूर्णपणे मुद्दल व व्याज प्रदान करण्यासाठी, या आवेदनाच्या वेळी या संबंधात स्पष्ट संमती देऊन, सूचना करू शकतो.

डी. संयुक्त नावे ठेवीच्या नूतनीकरण्याच्या बाबतीत, आवेदन फॉर्ममध्ये उल्लेख केल्याप्रमाणे कार्याच्या प्रकारानुसार आवेदन फॉर्मवर स्वाक्षरी करायला हवी.

ई. अन्यथा नमूद केले नसेल तर ठेवी स्वयंचलितपणे समाप्त होतील व परिपक्वता रक्कम ही निर्देशित बँक खात्यामध्ये वित्तप्रेषित करण्यात येईल. ठेवीच्या नूतनीकरणाअंतर्गत नोंद करण्यात आलेल्या अटींप्रमाणे ठेवींचे नूतनीकरण करण्यात आल्याशिवाय, अशा ठेवींवर त्यानंतर कोणतेही व्याज उपार्जित होणार नाही.

एफ. ठेवीच्या परिपक्वता तारखेच्या किमान 14 दिवस आधी ठेवीच्या परिपक्वतेच्या तपशीलाच्या संबंधात कंपनी सूचना पत्र पाठवेल. परिपक्वता तारखेच्या किमान 7 कार्यकारी दिवस आधी विनंती पत्र पाठवून किंवा कंपनीद्वारे संमत इतर कोणत्याही प्रकाराद्वारे तुम्ही परिपक्वता सूचनांमध्ये बदल करू शकता.

जी. सर्व रिडेम्पशन पेमेन्ट्स हे ईसीएस/एनईएफटी/आरटीजीएस/धनादेश/डीडीच्या/कंपनीला योग्य वाटेल त्या इतर कोणत्याही स्वरुपात असतील आणि "A/c Payee only' असा उल्लेख करून एकमेव/प्रथम ठेवीदार यांच्या नावे असतील. पहिला अर्जदार/ठेवीदार हा अल्पवयीन असण्याच्या बाबतीत, सर्व पेमेन्ट्स हे नैसर्गिक/कायदेशीर पालकासह (गार्डियनसह) अल्पवयीन व्यक्तीच्या नावे असतील.

5) मुदतीआधी ठेवीची रक्कम काढणे: हाउसिंग फायनान्स कंपनी (रिझर्व्ह बँक) निर्देशने, 2021 प्रमाणे, नियामक शर्तींच्या सापेक्ष ठेवीच्या तारखेपासून पहिल्या 3 महिन्यांच्या कालावधीसाठी कोणत्याही मुदतपूर्व विड्रॉअलला अनुमती असणार नाही. मुदतपूर्व विड्रॉअलच्या बाबतीत, पुढील दर लागू असतील:

मुदतपूर्व विड्रॉअल[1]	प्रदेय व्याज दर
3 महिन्यांनंतर परंतु 6 महिन्यांपूर्वी किंवा 6 महिन्यांपर्यंत	व्यक्तिगत ठेवीदारांसाठी प्रदेय कमाल व्याज हे आयसीआयसीआय बँकेद्वारे देऊ करण्यात येणाऱ्या किमान बचत बँक व्याज दराइतके असेल (प्रतिवर्ष 4% पेक्षा अधिक असणार नाही) आणि ठेवीदारांच्या इतर कोणत्याही प्रकाराच्या बाबतीत कोणतेही व्याज असणार नाही.
6 महिन्यांनंतर परंतु परिपक्वता तारखेपूर्वी	ज्या कालावधीसाठी ठेव चालू होती त्या कालावधीसाठी, सार्वजनिक ठेवींकरिता लागू व्याज दरापेक्षा 1% कमी इतक्या दराने व्याज प्रदेय असेल आणि त्या कालावधीसाठी कोणताही व्याज दर नमूद केला नसेल, तर कंपनीकडून ज्या किमान दराने सार्वजनिक ठेवी स्वीकारण्यात येतात, त्या दरापेक्षा 2% कमी दराने व्याज प्रदेय असेल.

[1]ठेवीच्या तारखेपासून

ठेवीदाराचा मृत्यू होण्याच्या बाबतीत, फिक्स्ड डिपॉझिट मुदतपूर्व समाप्त करण्याला अनुमती असेल; अशा मुदतपूर्व विड्रॉअलला कोणतेही दंडात्मक शुल्क आकारण्यात येणार नाही. इतर ठेवींसाठी, नियामक शर्तींच्या सापेक्ष गंभीर आजारासह आपात्कालीन स्वरुपाच्या काही खर्चांची पूर्तता करण्यासाठी 3 महिन्यांच्या आत मुदतपूर्व विड्रॉअलला अनुमती आहे (गंभीर आजारांबाबत अधिक माहितीसाठी, एफएक्यूजच्या मुद्दा क्र.12 चा संदर्भ घेण्यासाठी www.icicihfc.com/fixed-deposit/ ला भेट द्या).

ठेवींच्या मुदतपूर्व विड्रॉअल्ससाठी, आवश्यक मूल्याच्या महसूल मुद्राकासह यथोचितरीत्या डिस्चार्ज (विमुक्त) केलेला एफडीआर कंपनीकडे स्वाधीन करणे आवश्यक आहे. एकल/संयुक्तपणे धारण केलेल्या फिक्स्ड डिपॉझिटच्या मुदतपूर्व विड्रॉअलवरील प्रक्रिया ही यथोचितरीत्या डिस्चार्ज (विमुक्त) केलेल्या एफडीआरसह सर्व ठेवीदारांद्वारे अशा विनंतीवर स्वाक्षरी केल्यानंतरच करण्यात येईल.

6) टॅक्स डिडक्शन ॲट सोर्स (टीडीएस–स्रोतावर कर वजावट): आयकर अधिनियम, 1961 च्या (अधिनियम) कलम 194ए च्या तरतुदींसह व तरतुदींप्रमाणे, ग्राहकाकून अनेक फिक्स्ड डिपॉझिट ठेवण्यात आलेले असण्याच्या बाबतीत, आर्थिक वर्षादरम्यान निवासी ठेवीदाराला (ठेवीदारांना) देण्यात आलेले/भरणा करण्यात आलेले किंवा देण्याची शक्यता असलेले/भरणा करण्याची शक्यता असलेले व्याज हे एकत्रित रकमेवर ₹5,000/– पेक्षा अधिक असल्यास, टॅक्स ॲट सोर्स (स्रोतावर कर) वजा करण्यात येईल. अधिनियमाच्या कलम 195 अंतर्गत जेथे टॅक्स ॲट सोर्स (स्रोतावर कर) वजा करण्यात येतो त्या बाबतीत अनिवासी ठेवीदारांकरिता ही सूट लागू नाही. आयकर अधिनियम, 1961 च्या कलम 206 एए प्रमाणे, सर्व निवासी व अनिवासी एफडी ठेवीदाराला (ठेवीदारांना) लागू असल्याप्रमाणे 1 एप्रिल 2010 पासून, जेथे टॅक्स ॲट सोर्स (स्रोतावर कर) वजावटयोग्य आहे, तेथे वैध पॅन (स्थायी खाते क्रमांक) बंधनकारक आहे. सर्व निवासी व अनिवासी एफडी खातेदारासाठी (खातेदारांसाठी) 1 एप्रिल 2010 पासून लागू असल्याप्रमाणे, जेथे स्रोतावर कर वजावट बंधनकारक आहे, तेथे वैध पॅन (स्थायी खाते क्रमांक) बंधनकारक आहे. व्यक्तिगत ठेवीदारांच्या बाबतीत, आयकर अधिनियम, 1961 च्या कलम 139एए च्या आवश्यकतेप्रमाणे पॅनची आधारसोबत जोडणी करायला हवी. जेथे पॅन व आधार यांची जोडणी झालेली नाही, तेथे फॉर्म 15जी/एच आणि फॉर्म 60 स्वीकारण्यात येणार नाही. अवैध किंवा अकार्यरत पॅनच्या बाबतीत (पॅन–आधारची जोडणी न केल्यामुळे), 20% इतक्या सर्वोच्च दराने टीडीएस वजा करण्यात येईल आणि एकदा का तो वजा केल्यानंतर व शासनाकडे भरण्यात आल्यानंतर तो मागे फिरवता येणार नाही.

1 जुलै 2021 पासून प्रभावी अशा प्रकारे कलम 206एबीनुसार, ज्याच्यासाठी अधिनियमाच्या कलम 194ए अंतर्गत कर वजावटयोग्य आहे अशा कोणत्याही ठेवीदाराने ज्यासाठी कर वजावटयोग्य आहे अशा चालू वित्तीय वर्षाआधीच्या गत वर्षासाठी आयकर विवरण दाखल केलेले नसल्यास, आणि सदर मागील वर्षामध्ये ठेवीदाराच्या बाबतीत एकत्रित वजावट केलेला/संकलित केलेला कर हा ₹50,000/– किंवा त्यापेक्षा अधिक असल्यास, कर हा पुढीलपैकी उच्चतम दरासह वजा करण्यात येईल:
- कलम 194ए प्रमाणे नमूद दराच्या दुप्पट म्हणजेच 20%; किंवा
- प्रभावी दराच्या दुप्पट; किंवा
- **5%**

या कलमाच्या तरतुदीखेरीज, विनिर्दिष्ट व्यक्तीला अधिनियमाच्या कलम 206एए च्या तरतुदी लागू असल्यास (ज्यामध्ये करपात्र व्यक्तीकडे पॅन नाही), दोन दरांमधील सर्वोच्च दराने कर वजा करण्यात येईल.
तसेच, या संबंधातील तपशील आवेदन फॉर्ममध्ये प्रदान करण्यात येतो.

7) कर लाभ:
आयकर अधिनियम, 1961 च्या प्रचलित तरतुदींच्या अंतर्गत या फिक्स्ड डिपॉझिटवर कोणताही विशिष्ट कर लाभ उपलब्ध नाही.

8) ब्रोकरेज:
इम्पॅनेल्ड ब्रोकर्स हे या योजनेसाठी विहित केल्याप्रमाणे त्यांनी सज्ज केलेल्या फिक्स्ड डिपॉझिट्सच्या रकमेवर ब्रोकरेजसाठी/कमिशनसाठी पात्र आहेत.

9) दस्तऐवज गहाळ होणे, नष्ट होणे, इत्यादी:

ए) फिक्स्ड डिपॉझिट रिसीट्स, व्याज आणि रिफंड धनादेश/डीडीज हे आवेदन फॉर्ममध्ये देण्यात आलेल्या एकमेव/प्रथम अर्जदाराच्या/ठेवीदाराच्या पत्त्यावर, नोंदणीकृत टपालाद्वारे किंवा कुरियरद्वारे किंवा कंपनीला योग्य वाटेल त्या इतर कोणत्याही प्रकाराद्वारे पाठवण्यात येऊ शकतात. टपाल/कुरियर सेवांमुळे किंवा कंपनीच्या नियंत्रणाबाहेरील कोणत्याही परिस्थितींमुळे सदर गहाळ झाल्यास किंवा मिळण्यास विलंब झाल्यास, त्यासाठी कंपनी जबाबदार असणार नाही.

बी) फिक्स्ड डिपॉझिट रिसीट, व्याज किंवा रिफंड धनादेश/डीडी गहाळ होण्याच्या, नष्ट होण्याच्या किंवा विरुपित होण्याच्या बाबतीत, मूळ संलेखाची वटवणी करण्यात न येण्याच्या सापेक्ष, कंपनीच्या समाधानासापेक्ष विहित स्वरुपात ठेवीदाराकडून रिसीट मिळाल्यावर आणि कंपनीद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे अशा इतर कोणत्याही औपचारिकतांचे/दस्तऐवजांचे पालन केल्यानंतर, कंपनी ड्युप्लिकेट (दुसरी प्रत) फिक्स्ड डिपॉझिट रिसीट, व्याज किंवा रिफंड धनादेश/डीडी जारी करू शकते.

10) सर्वसाधारण:

ए) कंपनी ही कोणतेही कारण न देता ठेवीचे कोणतेही आवेदन किंवा ठेवीचे नूतनीकरण नाकारण्याचा हक्क राखून ठेवत आहे.

बी) फिक्स्ड डिपॉझिट रिसीट्स या हस्तांतरीत करता येणार नाहीत व त्या परक्राम्य (नेगोशिएबल) नाहीत. आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लि. यांच्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही पक्षकाराच्या नावे कोणत्याही कर्जासाठी/पत सुविधेसाठी त्यांचे अभिहस्तांकन, हस्तांतरण करता येऊ शकत नाही, तारण ठेवता येऊ शकत नाही किंवा प्रतिभूती म्हणून देता येऊ शकत नाहीत. कंपनीच्या खात्यामध्ये धनादेशाची/डीडीची वटवणी झाल्यानंतर किंवा रक्कम जमा झाल्यानंतर, एसएमएस लिंकद्वारे सॉफ्ट कॉपीच्या स्वरुपात, आवेदन फॉर्ममध्ये दिलेल्या पहिल्या अर्जदाराला/ठेवीदाराला एफडीआर्स पाठवण्यात येतील आणि तदनंतर नोंदणीकृत टपालाद्वारे किंवा कुरियरद्वारे किंवा कंपनीला योग्य वाटेल त्या इतर कोणत्याही प्रकाराद्वारे आवेदन फॉर्ममध्ये उल्लेख करण्यात आलेल्या पत्त्यावर हार्ड कॉपी पाठवण्यात येईल.

सी) व्याज दर हे बदलाच्या अधीन आहेत आणि लागू दर हा ठेवीच्या तारखेला प्रचलित असणाऱ्या दराप्रमाणे असेल.

डी) येथे नमूद करण्यात आलेल्या अटी व शर्ती या संबंधित आवेदन फॉर्ममध्ये नमूद करण्यात आल्यानुसार इतर सर्व अटी व शर्तींच्या जोडीने व त्याहून अधिक अशा प्रकारे वाचायच्या आहेत.

ई) लागू मार्गदर्शक निर्देशांनुसार, कंपनीकडे फिक्स्ड डिपॉझिटचे नियमन करणाऱ्या कोणत्याही अटी व शर्तींमध्ये बदल करण्याचा, त्यामध्ये सुधारणा करण्याचा, भर घालण्याच्या किंवा त्या काढून टाकण्याचा हक्क आहे आणि कंपनी अर्जदाराला/ठेवीदाराला सदरबाबत सूचित करेल. फिक्स्ड डिपॉझिट योजनेच्या संबंधात उद्भवणारे विवाद, जर असल्यास, हे मुंबई न्यायालये व न्यायाधिकरणे यांच्या क्षेत्राधिकाराच्या अधीन असतील.

व्यक्तींसाठी अतिरिक्त अटी व शर्ती

1) यसंयुक्त ठेवी: कमाल तीन व्यक्तींसह संयुक्त नावे ठेवी ठेवण्यात येऊ शकतात. सर्व ठेवीदारांची नावे व पत्ते हे ठेवादाराच्या (ठेवीदारांच्या) खातेवहीमध्ये (लेजरमध्ये) व रजिस्टरमध्ये दाखल करण्यात येतील. संयुक्त नावांमधील ठेवींवरील व्याज हे स्रोतावरील कर वजावटीच्या (टीडीएसच्या) हेतूसाठी पहिल्या ठेवीदाराला प्रदान करण्यात येईल आणि त्याच्याकडून/तिच्याकडून देण्यात आलेला कोणताही डिस्चार्ज हा संयुक्त ठेवीदारावर (ठेवीदारांवर) बंधनकारक असेल.

2) अल्पवयीन व्यक्तीच्या नावे ठेव: अल्पवयीन व्यक्तीच्या नावे ठेवी स्वीकारण्यात येतील परंतु त्यासाठी अशा अल्पवयीन व्यक्तीचे प्रतिनिधित्व त्याच्या/तिच्या नैसर्गिक किंवा कायदेशीर गार्डियनने (पालकाने) करणे आणि ठेवीच्या आवेदन फॉर्मवर अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने नैसर्गिक/कायदेशीर गार्डियनने (पालकाने) स्वाक्षरी करणे गरजेचे आहे. ठेवीच्या संबंधातील सर्व संपर्कव्यवहार हे सदर नैसर्गिक/कायदेशीर गार्डियनला संबोधित करण्यात येतील.

3) नामनिर्देशन: अर्जदार/ठेवीदार हा/हे, स्वतंत्रपणे असो किंवा संयुक्तपणे, प्रत्येक ठेवीसाठी केवळ एकच नामनिर्देशन करू शकेल. मुखत्यारपत्र धारक किंवा अल्पवयीन व्यक्तीच्या वतीने अर्ज करणारा गार्डियन हे नामनिर्देशन करू शकत नाहीत. अर्जदाराच्या (अर्जदारांच्या)/ ठेवीदाराच्या (ठेवीदारांच्या) मृत्यूच्या बाबतीत, नामनिर्देशित व्यक्तीला ठेव (ठेवी) प्रदान करण्याची प्रक्रिया जलद करण्यासाठी अर्जदाराला (अर्जदारांना)/ठेवीदाराला (ठेवीदारांना) नामनिर्देशित व्यक्तीची नमुना स्वाक्षरी देण्याची शिफारस करण्यात येते. अन्यथा नमूद केले नसेल तर, नामनिर्देशित व्यक्तीचे नाव ठेवीच्या रिसीटवर देण्यात येईल.

4) ठेवींवर कर्ज: ठेवीच्या तारखेपासून 3 महिन्यांच्या आत कंपनीकडून ठेवीवर कर्ज देण्यात येऊ शकेल, ही सुविधा कंपनीच्या संपूर्ण स्वेच्छानिर्णयानुसार देण्यात येईल. एफडीवर धारणाधिकार चिन्हांकीत करण्यात येईल आणि कर्ज हे ठेव रकमेच्या 75% पर्यंत देण्यात येऊ शकते, हे कंपनीकडून वेळोवेळी घालून देण्यात आलेल्या इतर अटी व शर्ती यांच्या सापेक्ष असेल. अशा कर्जांवरील व्याज हे ठेव दरापेक्षा 2% अधिक असेल. अल्पवयीन व्यक्तींच्या व अनिवासी भारतीयांच्या (एनआरआय) ठेवींसाठी ही सुविधा उपलब्ध नाही.

5) अनिवासी भारतीय (एनआरआय): एनआरआय व भारताबाहेर राहणाऱ्या भारतीय मूळाच्या निवासी व्यक्तींकडील ठेवी या एनआरआयकडील ठेवींच्या स्वीकृतीचे नियमन करणाऱ्या नियमनांनुसार स्वीकारण्यात येतील. कमाल 3 वर्षांच्या कालावधीसाठी ठेवी स्वीकारल्या जातील. व्याजाचा भरणा तसेच ठेवीची परतफेड हे एनआरओ (अनिवासी सर्वसाधारण) खात्यासाठी केवळ क्रेडिटद्वारे करण्यात येईल. स्रोतावरील आयकर हा अनिवासींसाठी लागू असल्याप्रमाणे वजा करण्यात येईल.

बिगर–बँकिंग वित्तीय कंपन्या आणि इतर बिगर–बँकिंग कंपन्या (जाहिरात) नियम, 1977 अंतर्गत आवश्यक असल्याप्रमाणे तपशील.

ए) कंपनीचे नाव: आयसीआयसीआय होम फायनान्स कंपनी लिमिटेड

बी) विधिसंस्थापनाची तारीख: 28 मे 1999

सी) (i) कंपनीद्वारे करण्यात येणारा व्यवसाय: घरे घेण्यासाठी, इमारती घेण्यासाठी किंवा कोणत्याही प्रकारची स्थावर मालमत्ता घेण्यासाठी तसेच अशा घरांच्या किंवा इमारतींच्या किंवा कोणत्याही प्रकारच्या स्थावर मालमत्तेच्या बांधकामाच्या, नूतनीकरणाच्या, विकासाच्या किंवा दुरुस्तीच्या हेतूसाठी कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना आर्थिक साहाय्य प्रदान करणे हा कंपनीचा मुख्य व्यवसाय आहे. कंपनीची कोणतीही सबसिडियरी कंपनी नाही

(ii) शाखा

शाखा	राज्य	शाखा	राज्य	शाखा	राज्य	शाखा	राज्य	शाखा	राज्य	शाखा	राज्य
विशाखापटणम	आंध्र प्रदेश	गांधीधाम	गुजरात	बोइसर	महाराष्ट्र	रत्नागिरी	महाराष्ट्र	अलवर	राजस्थान	भरुच	गुजरात
विजयवाडा	आंध्र प्रदेश	आणंद	गुजरात	पनवेल	महाराष्ट्र	पुदुचेरी	पुदुचेरी	झाशी	उत्तर प्रदेश	जानकीपुरम	उत्तर प्रदेश
गुंटूर	आंध्र प्रदेश	वापी	गुजरात	बदलापूर	महाराष्ट्र	चेन्नई–टी नगर	तामिळनाडू	खम्माम	तेलंगणा	इंदूर मेन – एमजी रोड	मध्य प्रदेश
नेल्लोर	आंध्र प्रदेश	रोहटक	हरयाणा	गाझियाबाद (कौशंबी)	उत्तर प्रदेश	चेन्नई–अण्णानगर	तामिळनाडू	मोरबी	गुजरात	अमीरपेट एनडीएमए	तेलंगणा
कुर्नूल	आंध्र प्रदेश	हिस्सार	हरयाणा	फरिदाबाद	हरयाणा	कोइंबतूरत	तामिळनाडू	वाराणसी	उत्तर प्रदेश	सेंट्रल डेहराडून	उत्तराखंड
राजहमुंद्री	आंध्र प्रदेश	अंबाला	हरयाणा	गुरगाव 1 – सेक्टर 29	हरयाणा	मदुराई	तामिळनाडू	बुलढाणा	महाराष्ट्र	केंगेरी	कर्नाटक
काकिनाडा	आंध्र प्रदेश	पानिपत	हरयाणा	नॉयडा	उत्तर प्रदेश	त्रिची	तामिळनाडू	बारामती	महाराष्ट्र	ईसीआयएल हैदराबाद	तेलंगणा
तिरुपती	आंध्र प्रदेश	कर्नाळ	हरयाणा	सेट्रल दिल्ली – करोल बाग	दिल्ली	सलेम	तामिळनाडू	धुळे	महाराष्ट्र	गोरखपूर	उत्तर प्रदेश
हैदराबाद – कुकटपल्ली	तेलंगणा	सोनपत	हरयाणा	ईस्ट दिल्ली – लक्ष्मी नगर	दिल्ली	चेन्नई–तांबरम	तामिळनाडू	बंगळुरू–चांदपुरा (याआधी इलेक्ट्रॉनिक सिटी म्हणू ओळखले जात होते)	कर्नाटक	बंगळुरू– सहकार नगर	कर्नाटक
हैदराबाद – सिकंदराबाद	तेलंगणा	यमुनानगर	हरयाणा	वेस्ट दिल्ली – जनकपुरी	दिल्ली	तिरुनेलवेली	तामिळनाडू				
हैदराबाद–दिलसुखनगर	तेलंगणा	बंगलोर–यशवंतपूर	कर्नाटक	नॉर्थ दिल्ली – पितमपुरा	दिल्ली	तिरुप्पूर	तामिळनाडू	दिल्ली करोल बाग –एनडीएमए	दिल्ली	नागपूर वर्धा रोड	महाराष्ट्र
वारंगळ	तेलंगणा	बंगलोर – व्हाइटफील्ड	कर्नाटक	नागपूर	महाराष्ट्र	वेल्लोर	तामिळनाडू	बंगळुरु यशवंतपूर– एनडीएमए	कर्नाटक	खरर	पंजाब
पटणा	बिहार	बंगलोर – जेपी नगर	कर्नाटक	नाशिक	महाराष्ट्र	आग्रा	उत्तर प्रदेश	मैसूर	कर्नाटक	पिथमपूर	मध्यप्रदेश
रायपूर	छत्तीसगढ	हुबळी	कर्नाटक	औरंगाबाद	महाराष्ट्र	लखनौ	उत्तर प्रदेश	नांदेड	महाराष्ट्र	धार	मध्यप्रदेश
बिलासपूर	छत्तीसगढ	बेळगाव	कर्नाटक	अमरावती	महाराष्ट्र	मेरठ	उत्तर प्रदेश	चंद्रपूर	महाराष्ट्र	पालनपूर	गुजरात
रांची	झारखंड	गुलबर्गा	कर्नाटक	जळगाव	महाराष्ट्र	अलाहाबाद–प्रयागराज	उत्तर प्रदेश	सिकंदराबाद ओपीएस	तेलंगणा	भिमावरम	आंध्र प्रदेश
जमशेदपूर	झारखंड	थिरुअनंतपूरम (त्रिवेंद्रम)	केरळ	अहमदनगर	महाराष्ट्र	डेहराडून	उत्तराखंड	चांदखेडा	गुजरात	आष्टा	मध्यप्रदेश
भुवनेश्वर	ओरिसा	कोची	केरळ	अकोला	महाराष्ट्र	लातूर	महाराष्ट्र	उज्जैन	मध्यप्रदेश	ओंगोल	आंध्र प्रदेश
कोलकाता –एजेसी बोस रोड	पश्चिम बंगाल	कोझीकोडे (कालिकत)	केरळ	चंदीगड	चंदीगड	सीकर	राजस्थान	भोपाळ	गुजरात	विदिशा	मध्यप्रदेश
कोलकाता – सबर्बन हावरा	पश्चिम बंगाल	कोल्लम	केरळ	पंचकुला	हरयाणा	सिलिगुडी	पश्चिम बंगाल	नरोल	गुजरात	मथुरा	उत्तर प्रदेश
अहमदाबाद – पश्चिम	गुजरात	थ्रीसुर	केरळ	लुधियाना	पंजाब	कानपूर	उत्तर प्रदेश	कालवाड रोड	राजस्थान	खर्डी	महाराष्ट्र
अहमदाबाद – निकोल	गुजरात	पलक्कड	केरळ	अमृतसर	पंजाब	बरेली	उत्तर प्रदेश	जगतपुरा	राजस्थान	पिलभित	उत्तर प्रदेश
सुरत	गुजरात	कोट्टायम	केरळ	पटियाला	पंजाब	अंधेरी एचएफसी टॉवर	महाराष्ट्र	विद्याधर नगर	राजस्थान	काशीपूर	उत्तराखंड
वडोदरा	गुजरात	इंदूर – नवलाखा	मध्य प्रदेश	भटिंडा	पंजाब	फिरोझपूर	पंजाब	नाशिक रोड	महाराष्ट्र	चोमू	राजस्थान
राजकोट	गुजरात	भोपाळ	मध्य प्रदेश	जालंधर	पंजाब	पठाणकोट	पंजाब	हरिद्वार	उत्तराखंड	दौसा	राजस्थान
मेहेसाणा	गुजरात	ग्वालियर	मध्य प्रदेश	श्रीगंगानगर	राजस्थान	जुनागढ	गुजरात	अमीरपेट	तेलंगणा	मचिलपटनम	आंध्र प्रदेश
भावनगर	गुजरात	जबलपूर	मध्य प्रदेश	जयपूर	राजस्थान	दावनगिरी	कर्नाटक	सतना	मध्यप्रदेश	मंदसौर	मध्यप्रदेश
होशंगाबाद	मध्य प्रदेश	पाली	राजस्थान	जयपूर – मेन	राजस्थान	चित्तोडगड	राजस्थान	दुर्ग	छत्तीसगड	रुद्रपूर	उत्तराखंड
मीरा रोड	महाराष्ट्र	पुणे–मेन	महाराष्ट्र	जोधपूर	राजस्थान	शिमोगा	कर्नाटक	लखनौ–दक्षिण	उत्तर प्रदेश	देवास	मध्यप्रदेश
वसई	महाराष्ट्र	पुणे–वाकड	महाराष्ट्र	कोटा	राजस्थान	हसन	कर्नाटक	बाराबंकी	उत्तर प्रदेश	हिम्मतनगर	गुजरात
मुंबई – बोरिवली	महाराष्ट्र	सोलापूर	महाराष्ट्र	अजमेर	राजस्थान	सागर	मध्यप्रदेश	सहारनपूर	उत्तर प्रदेश	पाटन	गुजरात
ठाणे	महाराष्ट्र	कोल्हापूर	महाराष्ट्र	उदयपूर	राजस्थान	गुणा	मध्यप्रदेश	आरसी पुरम	तेलंगणा	रायबरेली	उत्तर प्रदेश
डोंबिवली	महाराष्ट्र	सांगली	महाराष्ट्र	भिलवाडा	राजस्थान	रतलाम	मध्यप्रदेश	मोडासा	गुजरात	तूतीकोरिन	तामिळनाडू
वाशी	महाराष्ट्र	सातारा	महाराष्ट्र	बिकानेर	राजस्थान	सुरेंद्रनगर	गुजरात				

d) कंपनीच्या व्यवस्थापनाचा संक्षिप्त तपशील: कंपनीच्या संचालकीय मंडळाकडे कंपनीच्या कामकाजाची संपूर्ण जबाबदारी आहे. श्री. विनोद कुमार धाल हे मंडळाचे स्वतंत्र संचालक चेअरमन आहेत. श्री. अनिरुद्ध कमानी, एमडी व सीईओ यांच्याकडे कंपनीच्या व्यवसायाची एकंदर जबाबदारी आहे.

e) संचालकाचे नाव, पत्ता व व्यवसाय:

नाव : राकेश झा
व्यवसाय : सर्व्हिस
पत्ता : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे–कुर्ला संकुल, मुंबई 400 051

नाव : संजय सिंघवी
व्यवसाय : सर्व्हिस
पत्ता : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे–कुर्ला संकुल, मुंबई 400 051

नाव : झीनत हमिराणी
व्यवसाय : सर्व्हिस
पत्ता : आयसीआयसीआय बँक टॉवर्स, वांद्रे–कुर्ला संकुल, मुंबई 400 051

नाव : एस. संथनाकृष्णन
व्यवसाय : सनदी लेखापाल
पत्ता : नवीन क्र.24, उन्नामलाई अम्माल स्ट्रीट, टी नगर, चेन्नई 600 017

नाव : विनोद कुमार धाल
व्यवसाय : ॲडव्होकेट
पत्ता : दिवाण मनोहर हाउ, बी–88, सेक्टर 51, नोएडा (यू.पी.) – 201301

नाव : जी गोपालकृष्णा
व्यवसाय : निवृत्त एक्झिक्युटिव्ह
पत्ता : बी 301– 302, लेडी रतन टॉवर, दैनिक शिवनेर मार्ग, गांधीनगर, वरळी, मुंबई– 400018

नाव : अनिरुद्ध कमानी
व्यवसाय : सर्व्हिस
पत्ता : आयसीआयसीआय एचएफसी टॉवर्स, अंधेरी–कुर्ला रोड, मुंबई 400 059

एफ) नफा व लाभांश:

वर्ष समाप्ती	करपूर्व नफा (₹ दशलक्षांमध्ये)	करपश्चात नफा	घोषित करण्यात आलेला समभाग लाभांश (%)[1]
मार्च 2023	3,868.2	3,018.2	2.5%
मार्च 2022	2,122.3	1,641.7	1.5%
मार्च 2021	326.4	216.7	-

[1]अंतिम लाभांश समाविष्ट, इक्विटी भाग भांडवलाच्या टक्क्यांच्याा स्वरुपात संबंधित वित्तीय वर्षाच्या अखेरीस प्रस्तावित करण्यात आल्याप्रमाणे.

जी) दोन अलीकडच्या लेखापरीक्षित ताळेबंदांमध्ये दिसून आल्याप्रमाणे कंपनीची संक्षिप्त स्वरुपातील वित्तीय स्थिती:

(₹ दशलक्षांमध्ये)

दायित्वे #	31 मार्च 2023 रोजी	31 मार्च 2022 रोजी
भाग भांडवल	12,035.3	10,987.5
राखीव व आधिक्य	16,034.3	10,063.5
नॉन–करंट (बिगर चालू) दायित्वे	109,626.4	83,870.5
प्रतिभूत कर्ज	81,624.2	59,533.8
अप्रतिभूत कर्ज	27,840.3	24,160.9
इतर	161.8	175.8
चालू दायित्वे	51,122.4	54,386.8
प्रतिभूत कर्ज	19,271.2	29,859.4
अप्रतिभूत कर्ज	19,882.4	14,012.9
इतर	11,968.8	10,514.5
विस्थगित कर दायित्वे (निव्वळ)	565.3	-
तरतुदी	65.0	94.7
अल्पकालीन	41.9	71.1
दीर्घकालीन	23.1	23.6
एकूण	**189,448.7**	**159,403.0**

कोणत्याही माहितीसाठी किंवा शंकांसाठी, तुम्ही पुढील क्रमांक 18002674455 वर आमच्याशी संपर्क साधू शकता किंवा customer.care@icicihfc.com वर आम्हाला ईमेल करू शकता.
तुमच्या नजीकच्या आयसीआयसीआय एचएफसी शाखेमध्ये किंवा तुमच्या नजीकच्या आयसीआयसीआय बँक असेट सर्व्हिसिंग शाखेमध्ये आमची कायदा व तांत्रिक क्षेत्रातील तज्ज्ञांची टीम तुमच्या मदतीसाठी सज्ज आहे. तुमचे निवारणाने समाधान न झाल्यास, कृपया हृषिकेश कदम, आमचे तक्रार निवारण अधिकारी यांना nodal.office@icicihfc.com येथे लिहून कळवा किंवा 022 66493844 वर संपर्क साधा.

(₹ दशलक्षांमध्ये)

माल मत्ता #	31 मार्च 2023 रोजी	31 मार्च 2022 रोजी
निश्चित मत्ता[1]	1,387.2	1,302.4
गुंतवणूक	4,991.6	6,004.1
विस्थगित कर मत्ता	-	15.8
कर्ज	175,436.2	144,985.0
इतर मत्ता	7,633.7	6,670.0
विक्रीसाठी बाळगलेल्या मत्ता	-	425.7
एकूण	**189,448.7**	**159,403.0**

1. फिक्स्ड (निश्चित) मत्तांमध्ये वर्क–इन–प्रोग्रेस भांडवल, अमूर्त मत्ता, विकासाच्या अधीन असणाऱ्या अमूर्त मत्ता यांचा समावेश आहे.
# चालू वर्षाच्या वर्गीकरणांसाठी/प्रकटीकरणांसाठी सहसंबंधाकरिता जेथे गरजेचे असेल तेथे मागील वर्षांचे आकडे पुन्हा एकत्र करण्यात आलेले आहेत/पुन्हा वर्गीकृत करण्यात आलेले आहेत.

(₹ दशलक्षांमध्ये)

आकस्मिक दायित्वे	31 मार्च 2023 रोजी	31 मार्च 2022 रोजी
अपिलामध्ये असणारी आयकर प्रकरणे	417.4	416.3
सेवा कर प्रकरणे	-	-
कंपनीविरोधात दाखल करण्यात आलेले परंतु डेब्ट (ऋण) म्हणून अभिस्वीकृती करण्यात न आलेले दावे	34.0	13.9

h) समान समूहामधील कंपन्या किंवा इतर संस्था किंवा बिझनेस व्हेन्चर यांकडून ज्यामध्ये, संचालक आणि/किंवा एचएफसी हे लक्षणीय स्वारस्य बाळगतात, एकत्रित देय रकमेशी (यामध्ये प्रदान करण्यात आलेल्या नॉन–फंड बेस सुविधा समाविष्ट) संबंधित माहिती आणि अशा संस्थांप्रती एक्स्पोजरची एकूण रक्कम:

(₹ दशलक्षांमध्ये)

सुविधा	31 मार्च 2023 ला बेस्ड फंड	31 मार्च 2023 ला बेस्ड नॉन–फंड
ज्यामध्ये संचालकांचे आणि/किंवा कंपनीचे लक्षणीय स्वारस्य आहे त्या समूह कंपन्यांप्रती एकूण एक्स्पोजर	-	-
ज्यामध्ये संचालकांचे आणि/किंवा कंपनीचे लक्षणीय स्वारस्य आहे त्या समूह कंपन्यांकडून एकूण एक्स्पोजर	1,208.6	-

i) आरबीआय निर्देशने, 2021 च्या परिभाषेमध्ये, कंपनी ही 31 मार्च 2022 रोजी किंवा त्यानंतर, म्हणजेच ₹ 254,724.00 दशलक्ष (31 मार्च 2023 रोजी एनएफओ) निव्वळ मालकीच्या निधीच्या बारा पटीपर्यंत रक्कम उसनी घेऊ शकते, त्यातील, निव्वळ मालकीच्या निधीच्या तीन पटींपेक्षा अधिक नाही अशी रक्कम म्हणजेच ₹ 63,681.00 दशलक्ष इतकी रक्कम सार्वजनिक ठेवींद्वारे असू शकते. 31 मार्च 2023 ला, कंपनीद्वारे बाळगण्यात आलेल्या एकूण सार्वजनिक ठेवी या ₹ 21,415.28 दशलक्ष इतक्या होत्या. अनक्लेम्ड (दावा न केलेल्या) ठेवींव्यतिरिक्त इतर कोणत्याही थकीत ठेवी नाहीत.

j) आम्ही घोषित करतो की: (1) कंपनीने तिच्यासाठी लागू असणाऱ्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन केलेले आहे, (2) निर्देशांचे पालन करण्याचा अर्थ असा होत नाही की भारतीय रिझर्व्ह बँकेने व नॅशनल हाउसिंग बँकेने ठेवींच्या परतफेडीची हमी दिलेली आहे; आणि (3) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी या अप्रतिभूत आहेत आणि कंपनीच्या इतर अप्रतिभूत दायित्वांशी समानतया श्रेणीच्या आहेत.

कंपनीकडे नॅशनल हाउसिंग बँक अधिनियम, 1987 च्या कलम 29 ए अंतर्गत जारी करण्यात आलेले 31–07–2001 तारखेचे वैध नोंदणी प्रमाणपत्र आहे. तथापि, भारतीय रिझर्व्ह बँक ही कंपनीच्या आर्थिक सुदृढतेबाबत सद्य स्थितीबाबत किंवा कंपनीद्वारे करण्यात आलेल्या कोणत्याही विधानांच्या किंवा करण्यात आलेल्या कोणत्याही निवेदनांच्या किंवा व्यक्त करण्यात आलेल्या मतांच्या अचूकतेबाबत आणि ठेवींच्या परतफेडीबाबत/कंपनीद्वारे दायित्वांच्या डिस्चार्जबाबत (विमुक्तीबाबत) कोणतीही जबाबदारी स्वीकारत नाही किंवा हमी देत नाही.

वरील मजकुराला 17 एप्रिल 2023 रोजी घेण्यात आलेल्या सभेमध्ये संचालकीय मंडळाद्वारे मंजुरी देण्यात आलेली आहे आणि कंपनीच्या संचालकीय मंडळाच्या नावे व अधिकारावर जारी करण्यात आलेला आहे. कंपनीच्या बहुतांश संचालकांद्वारे स्वाक्षरी केलेल्या जाहिरातीच्या मजकुराची प्रत ही नॅशनल हाउसिंग बँकेकडे दाखल करण्यात आलेली आहे.

दिनांक: एप्रिल 17, 2023
स्थळ: मुंबई

संचालकीय मंडळाच्या आदेशानुसार
प्रियंका शेट्टी
कंपनी सचिव